# राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र
## बृहन्मुंबई खंडपीठ

माहितीचा अधिकार

**माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १८ अन्वये दाखल झालेली तक्रार**

**रामाआ- तक्रार क्र. बीएम- २२७/२०२१**

**तक्रारकर्ता श्री. दिपक अमुभाई चुडासामा**

**विरुद्ध**

**जन माहिती अधिकारी तथा सहाय्यक उपमुख्य अधिकारी (पणन)**
मुंबई गृहनिर्माण व क्षेत्रविकास मंडळ, गृहनिर्माण भवन, १ ला मजला,
रुम नं.२४०, कलानगर, वांद्रे (पूर्व)
मुंबई -४०० ०५१.

**प्रथम अपिलीय अधिकारी तथा उप अभियंता (पणन)**
मुंबई गृहनिर्माण व क्षेत्रविकास मंडळ, गृहनिर्माण भवन, १ ला मजला,
रुम नं.२४०, कलानगर, वांद्रे (पूर्व)
मुंबई -४०० ०५१.

**तक्रार अर्ज सुनावणी दिनांक : ०९.०४.२०२६**

| | | |
|---|---|---|
| तक्रारकर्ता | : | अनुपस्थित (ट्रॅकिंग रिपोर्टप्रमाणे दि. ०१.०४.२०२६ रोजी नोटीस प्राप्त झाली आहे.) |
| विद्यमान जन माहिती अधिकारी | : | अनुपस्थित (ट्रॅकिंग रिपोर्टप्रमाणे दि. ०१.०४.२०२६ रोजी नोटीस प्राप्त झाली आहे.) |
| प्रथम अपिलीय अधिकारी | : | अनुपस्थित (ट्रॅकिंग रिपोर्टप्रमाणे दि. ०१.०४.२०२६ रोजी नोटीस प्राप्त झाली आहे.) |

आयोगाने यापूर्वी अपील क्र. MHSICMU/२०१९/M/००१५४४ प्रकरणी आयोगाने दि.२०.०५.२०२१ रोजी पुढीलप्रमाणे निष्कर्ष नोंदवून आदेश पारित केले आहेत :-

*"अपिलार्थी यांनी दाखल केलेला व्दितीय अपील अर्ज माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम (१८) अंतर्गत तक्रार म्हणून दाखल करण्यात येत आहे."*

२. उक्त आदेशाच्या अनुषंगाने आयोगाच्या कार्यालयाने दि. २४.०५.२०२२ रोजीच्या पत्रान्वये जन माहिती अधिकारी तथा सहाय्यक उपमुख्य अधिकारी (पणन) यांचे कार्यालय, मुंबई गृहनिर्माण व क्षेत्रविकास मंडळ, गृहनिर्माण भवन, वांद्रे (पूर्व), मुंबई यांच्याकडून अहवाल मागितला. जन माहिती अधिकारी तथा सहाय्यक उपमुख्य अधिकारी (पणन) यांचे कार्यालय, मुंबई गृहनिर्माण व क्षेत्रविकास मंडळ, गृहनिर्माण भवन, वांद्रे (पूर्व), मुंबई यांच्याकडून आयोगास अहवाल प्राप्त झालेला नाही.

३. सुनावणीच्या वेळी तक्रारकर्ता, जन माहिती अधिकारी व प्रथम अपिलीय अधिकारी कोणतीही सुचना न देता अनुपस्थित आहे.

४. जन माहिती अधिकारी यांचा आयोगाच्या आदेशाच्या अनुषंगाने अहवाल प्राप्त झालेला नाही. आयोगाच्या कार्यालयाने जन माहिती अधिकारी यांना अहवालासाठी स्मरणपत्र पाठवावे.

..२/-

५. सदर प्रकरणी कोणतेही आदेश पारित करण्याअगोदर जन माहिती अधिकारी व प्रथम अपिलीय अधिकारी यांची उपस्थिती आवश्यक आहेत. सदर प्रकरणी पुन्हा सुनावणी घेण्यात येईल.

६. पुढील सुनावणीच्या वेळी जन माहिती अधिकारी व प्रथम अपिलीय अधिकारी यांनी आजच्या सुनावणीस अनुपस्थितीबद्दलच्या लेखी खुलाशासह तसेच उपलब्ध माहितीसह उपस्थित रहावे.

**आदेश**

**सदर प्रकरणी पुढील सुनावणी दि. १३.०५.२०२६ रोजी दुपारी ०२.०० वाजता घेण्यात येईल.**

State Information Commission
Greater Mumbai

10-4-2026

**(डॉ. प्रदीप व्यास)**
**राज्य माहिती आयुक्त, बृहन्मुंबई**

**मुंबई**
**दिनांक : १०.०४.२०२६**